# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : १३/११/२०१८

**आलोसे १) काशिनाथ राधाकिसन वाघ, मंडळ अधिकारी, सजा कोपरगांव, कार्यभार हिंगणी, जि.अहमदनगर व २) जनार्दन रतन शिंदे, खाजगी इसम, रा.कारवाडी, ता.कोपरगांव, जि. अहमदनगर यांना ४,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार यांचे शेतीच्या ७/१२ उताऱ्यावरील नांवे कमी करण्यासाठी त्यांनी तहसिलदार कोपरगांव कार्यालयात अर्ज केला होता. सदर अर्जावरुन तहसिलदार कोपरगांव यांनी शेतीचे ७/१२ उताऱ्यावरुन नांव कमी केल्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे तलाठी यांनी ७/१२ उताऱ्यावर आदेशाप्रमाणे नोंद घेऊन नोंद मंजुर करण्यासाठी प्रकरण मंडळ अधिकारी कोपरगांव यांचेकडे पाठविले असता तक्रारदार यांनी मंडळ अधिकारी कोपरगांव यांना कार्यालयात भेटून सदर नोंद मंजुर करण्याची विनंती केली असता आलोसे काशिनाथ राधाकिसन वाघ, मडळ अधिकारी, सजा कोपरगांव, कार्यभार हिंगणी, जि. अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे सदरची नोंद मंजुर करण्याकरीता ४,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक १३/११/२०१८ रोजी ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे काशिनाथ राधाकिसन वाघ, मंडळ अधिकारी, सजा कोपरगांव, कार्यभार हिंगणी, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांचे शेतीच्या ७/१२ उताऱ्यावरील नांवे कमी करण्याकरीताची नोंद मंजुर करण्यासाठी ४,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम खाजगी इसम जनार्दन रतन शिंदे, रा.कारवाडी, ता.कोपरगांव, जि. अहमदनगर यांचे हस्ते मंडळ अधिकारी कार्यालय कोपरगांव येथे स्विकारली असता वरील दोन्ही आलोसे यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता